# बृहन्मंबई महानगरपालिका

## मनपा अतिरिक्त आयुक्त, (पश्चिम उपनगरे) यांचे कार्यालय,

## ३ रा मजला, विस्तारित बिल्डींग, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.

वेबसाईट – www.mcgm.gov.in

विविध विषयातील प्राध्यापक, बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, गट-अ

जाहिरात क्रमांकः गोसुंवैम/जीएचसी/१६२२ दिनांक – २६.०७.२०१८

महानगरपालिका वैद्यकीय निवड समिती मार्फत बृहन्मंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अतिविशेषकृत विषयातील प्राध्यापक, बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, गट-अ च्या खालील १० विषयाच्या एकूण ११ पदांच्या भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात. प्रत्येक पदासाठी पृथक अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. उपलब्ध पदसंख्याः-

| अनु. क्रमांक | विषय | Department | एकूण पदसंख्या | अराखीव | नियमित / तदर्थ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | किडनीविकारशास्त्र | Nephrology | १ | १ | नियमित | |
| २ | सुघटन शल्यचिकित्साशास्त्र | Plastic Surgery | १ | १ | नियमित | |
| ३ | हृदयरोग शल्यचिकित्साशास्त्र | Cardio Vascular Thorasic Surgery | १ | १ | नियमित | |
| ४ | मूत्ररोग चिकित्साशास्त्र | Urology | १ | १ | नियमित | |
| ५ | मज्जातंतू चिकित्साशास्त्र | Neurology | १ | १ | नियमित | |
| ६ | हृदयरोग चिकित्साशास्त्र | Cardiology | १ | १ | नियमित | |
| ७ | नवजात अर्भकशास्त्र | Neonatology | १ | १ | तदर्थ | अर्हतांस राज्यशासनाची मंजूरी प्रतिक्षाधिन असल्याने तदर्थ तत्वावर नियुक्ती करण्यात येईल. |
| ८ | रूधिराभिसरणशास्त्र | Hematology | १ | १ | तदर्थ | |
| ९ | जठरांत्र चिकित्साशास्त्र | Gastroenterology | २ | २ | तदर्थ | |
| १० | चिकित्सालयीन औषधनिर्माणशास्त्र | Clinical Pharmacology | १ | १ | तदर्थ | |
| @ विकलांग वर्गवारीसाठी पद आरक्षित नाही. | | | | | | |

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.
२.२ उपरोक्त प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे ही अतिविशेषकृत शाखेतील असल्याने सदर विषयातील प्राध्यापक पदाकरीता अर्ज करण्यास विकलांग वर्गवारीचे उमेदवार अपात्र आहेत.
२.३ उपरोक्त प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे ही अतिविशेषकृत शाखेतील असल्याने सदर पदांना आरक्षण लागू नाही.
२.४ तदर्थ तत्वावर शिफारस केलेले उमेदवार महानगरपालिका सेवेत कार्यरत असल्यास प्रत्येक ६ महिन्यांपूर्वी एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन पूर्ननियुक्ती करण्यात येईल आणि जर उमेदवार महानगरपालिका सेवेत नसल्यास प्रत्येक ६ महिन्यांपूर्वी एक दिवसाचा सेवा खंड देउन पूर्ननियुक्ती करण्यात येईल.

३. वेतनश्रेणीः पे बॅण्ड रू. ३७४००-६७०००+१०००० ग्रेड पे इतर भत्ते

४. पात्रताः-

४.१ दिनांक २६ जुलै २०१८ रोजीउमेदवाराचे वय अमागास वर्गवारी करीता ४५ वर्षे व मागासप्रवर्गाकरीता ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचा-यांसाठी उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.३ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी समितीकडून विचार करण्यात येईल, परंतु समितीच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरीष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

४.४ अर्हता -

| अनु. क्र. | विषय | Department | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | किडनीविकारशास्त्र | Nephrology | D.M.(Nephrology) | As Reader/Assoc.Prof.in NEPHROLOGY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| २ | सुघटन शल्यचिकित्साशास्त्र | Plastic Surgery | M.Ch.(Plastic & Reconstructive Surgery)/M.Ch. (Plastic Surgery) | As Reader/Assoc.Prof. in PLASTIC & RECONSTRUCTIVE SURGERY/PLASTIC SURGERY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| ३ | हृदयरोग शल्यचिकित्साशास्त्र | Cardio Vascular Thorasic Surgery | M.Ch.(Cardio vascular & Thoracic surgery)/M.Ch.(Cardiac Surgery)/M.Ch.(Vascular Surgery)/M.Ch.(Thoracic Surgery) | As Reader/Assoc.Prof. in CARDIO VASCULAR & THORACIC SURGERY/CARDIAC SURGERY/VASCULAR SURGERY/THORACIC SURGERY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| ४ | मूत्ररोग चिकित्साशास्त्र | Urology | M.Ch.(Urology) | As Reader/Assoc.Prof. in UROLOGY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| ५ | मज्जातंतू चिकित्साशास्त्र | Neurology | D.M.(Neurology) | As Reader/Assoc.Prof. in NEUROLOGY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| ६ | हृदयरोग चिकित्साशास्त्र | Cardiology | D.M. (Cardiology) | As Reader/Assoc.Prof. in CARDIOLOGY for four years in a recognised Medical College/Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| ७ | नवजात अर्भकशास्त्र | Neonatology | D.M.(Neonatology)/M.D.(Paediatrics)<br><br>with 2 years special training in Neonatology. | As Reader/Assoc.Prof. in NEONATOLOGY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| ८ | रूधिराभिसरणशास्त्र | Haematology | D.M.(CLINICAL Haematology)/<br><br>M.D. (Medicine) or M.D. (Paediatrics) or M.D.(Pathology) with 2 years special training in Clinical Haematology. | As Reader/Assoc.Prof. in CLINICAL HAEMATOLOGY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |
| ९ | जठरांत्र चिकित्साशास्त्र | Gastroenterology | D.M. (Medical Gastroenterology)/ D.M. (Gastroenterology)/M.D. (Medicine) or M.D.(Paedicatrics) with 2 years special training in Gastroenterology. | As Reader/Assoc.Prof. in GASTROENTEROLOGY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | चिकित्सालयीन औषधनिर्माणशास्त्र | Clinical Pharmacology | D.M.(Clinical Pharmacology)/<br><br>M.D.(Pharmacology) with 2 years special training in Clinical Pharmacology. | As Reader/Assoc.Prof. in CLINICAL PHARMACOLOGY for four years in a recognised Medical College/ Teaching Institution. Desirable:- Minimum of four research publications in Index Medicus/National Journal & one research publication in international Journal. |

४.५ परिपत्रक क्र. एमपीएम / २ / ७९८४ दिनांक- २०.०६.२०१६ नुसार उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा ५० गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

अ) "उमेदवार प्रथम नियुक्तीच्या वेळी उपरोक्त मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती २ वर्षासाठी मराठी भाषा उत्तीर्ण होण्यासापेक्ष तात्पुरत्या स्वरूपाची असेल.''

ब) "उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मराठी भाषा हा विषय घेवून किंवा महानगरपालिकेमार्फत घेण्यात येणारी मराठी भाषेची परीक्षा प्रथम वार्षिक वेतनवाढ मिळण्यापूर्वी उत्तीर्ण न झाल्यास त्यास वार्षिक वेतनवाढ देण्यात येणार नाही. तथापि, उमेदवार नियुक्तीपासून २ वर्षाच्या कालावधीत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाले तर त्यांना देय असलेली वार्षिक वेतनवाढ देखील मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात येईल.''

क) "सदर उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मराठी भाषा हा विषय घेवून किंवा महानगरपालिकेमार्फत घेण्यात येणारी मराठी भाषेची परीक्षा नियुक्तीपासून २ वर्षांच्या कालावधीत उत्तीर्ण न झाल्यास त्याची सेवा खंडीत करण्यात येईल.''

४.६ परिपत्रक क्र. MPM/२/६२११, दिनांक १८ फेब्रुवारी २००९ (महानगरपालिका ठराव क्र. १६० दि. ५ मे २००८) अन्वये संगणक अर्हता, सेवेत प्रवेश केल्यापासुन दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.(सविस्तर तपशील अट क्र.17.5 मध्ये नमूद केला आहे.)

५. परिविक्षाधिन कालावधी ३ वर्षे

६. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी पेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता / अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेदवारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.

७. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

**८. शुल्कः**

**८.१ अमागास – रू ५१५/- मागासवर्गीय – रू ३१५/- अधिक वस्तु व सेवाकर.**

**९. अर्ज करण्याची पध्दत –**

**९.१ प्रस्तुत रिक्त पदांसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.**

**९.२ पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज www.mcgm.gov.inया वेबसाईटदवारे दिनांक २६ जुलै, २०१८ ते दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.**

९.३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना महानगरपालिकेच्या या संकेतस्थळावर www.mcgm.gov.inउपलब्ध आहेत.

९.४ विहित पध्दतीने समितीस अर्ज सादर केल्यानंतर अर्जाचे शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ महानगरपालिकेने निश्चित केलेले अर्जाचे शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनादवारे

९.६ अर्जाच्या शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावाः-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील “माझे खाते” या लिंक वर क्लिक करावे.

(२) “माझे खाते” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ‘Unpaid’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) “Pay Now”या लिंक वर क्लिक केल्यानंतर चलनाद्वारे पर्याय उपलब्ध होईल

(४) उमेदवाराने, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्क भरणे आवश्यक आहे.

(५) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनादवारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत अर्जाचे शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करून देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे

आवश्यक आहे.

११. चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२. महानगरपालिकेच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

१३. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मुळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. मुलाखतीचे वेळी मूळ प्रमाणपत्रासहित सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक साक्षांकित संच सोबत असणे आवश्यक आहे.

**१४. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन, भारतीय स्टेट बँकेमध्ये अर्जाचे शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही ही दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१५. चलनादवारे भरावयाचे अर्जाचे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १० ऑगस्ट,२०१८ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे, विहित दिनांकानंतर अर्जाचे शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच अर्जाच्या शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

१६. कर्तव्ये :- भारतीय वैद्यक परिषदेच्या निकषानुसार विभाग प्रमुख / खाते प्रमुख (अधिष्ठाता) यांनी शैक्षणिक, संशोधन, वैद्यकीय व विविध प्रकारचे नेमुन दिलेले कामकाज.

१७. सर्वसाधारण अटी व शर्ती :- प्रस्तुत पदाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१७.१)रिक्तपदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार मा. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

१७.२) जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या पद संख्येत बदल होऊ शकतो.

१७.३) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखादया कर्मचा-याला अर्ज करावयाचा असेल तर त्याने / तिने त्याच्या / तिच्या खातेप्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७.४) उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहीत अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी व कुठल्याही टप्प्यावर निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१७.५) प्राध्यापक या पदाकरिता अर्ज करणारे उमेदवार, जरी यापूर्वीच महानगरपालिका सेवेत कार्यरत असतील त्यांना देखील संगणकाचे ज्ञान अवगत करणे नियमानुसार गरजेचे राहील. त्याने / तिने डीओईएसीसी सोसायटीचे 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे किंवा त्यांनी महाराष्ट्र राज्य व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांची 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' ही परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे किंवा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत उपरोक्त संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१७.६) उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिका, एम.बी.बी.एस. परिक्षेची गुणपत्रिका, पदव्युत्तर परिक्षेचे उत्तीर्ण प्रमाणपत्र व सर्व पदवी प्रमाणपत्र यांच्या साक्षांकित छायांकित प्रती वैयक्तिक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहीत महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात. पदवी व पदव्युत्तर परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१७.७) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थितीत रहावे लागेल.

१७.८) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' अर्जासोबत जोडावे.

१७.९) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो नियुक्तीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराने पोलिस स्टेशनकडून चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्या बाबतचा तपशील देणे आवश्यक आहे. नियुक्तीच्या वेळी संबंधित पोलिस स्टेशनकडून नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१७.१०) निवड झालेल्या उमेदवाराविरूद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

१७.११) उमेदवार यापूर्वीच महानगरपालिका सेवेत नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना संबंधीत पदावर नियुक्ती करण्यापूर्वी १ महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम सुरक्षित अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) जामीनपत्र सादर करावे लागेल. सदर भरलेली सुरक्षित अनामत रक्कम भरुनसुध्दा महानगरपलिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांनी भरलेल्या अनामत रक्कमेचा त्यांना परतावा मिळण्याचा हक्क राहणार नाही. महानगरपालिका सेवेत कार्यरत असल्यास अनामत रक्कम भरणे आवश्यक नाही.

१७.१२) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात/

रूग्णालयात करण्यात येईल व त्याची महानगरपालिकेतील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात/ रूग्णालयात आवश्यकतेनुसार बदली करण्यात येईल.

१७.१३) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहीती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१७.१४) निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती नंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम १९९९ वेळोवेळी होणा-या सुधारणेनुसार लागू होतील.

१७.१५) उमेदवार महानगरपालिका सेवेत दि.०५.०५.२००८पासून कार्यरत असल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती नंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम १९५३ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१७.१६) तदर्थ तत्वावर नियुक्त होणा-या कर्मचा-यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना, सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१७.१७) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य, परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

१७.१८) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महानगरपलिका वैद्यकीय निवड समितीला असतील.

१७.१९) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.

१७.२०) निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नविन भरती प्रक्रियेसाठी जाहीरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत किंवा दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

१८. प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे कार्यालयीन कामकाज सेठ गो. सुं. वैद्यकीय महाविद्यालयामार्फत पाहिले जाते. संपर्कासाठी दुरध्वनी क्र. २४१०७०३२/ २४१०७४४१ / २४१०७४४०

१९ विशेष सूचना:-

१९.१ एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

१९.२मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे.

ठिकाण - मुंबई

दिनांक - २६.०७.२०१८

सही/-

(डॉ.अविनाश सुपे)

संचालक वै.शि. व प्र. रु.